## अभिव्यक्ती स्वारस्याची जाहीर सुचना

## (Expression Of Interest)

सिडको महामंडळाच्या नवी मुंबई प्रकल्पाअंतर्गत येणाऱ्या मौजे जासई, मौजे चिर्ले, मौजे बेलोंडेखार, मौजे कौलीबेलोंडेखार, मौजे धुतुम, मौजे पौडखार, मौजे गावठाण, मौजे जांभूळपाडा या उरण तालुक्यातील 8 गावातील जमीन सिडको महामंडळ लॉजिस्टीक पार्क विकसीत करण्यासाठी संपादीत करुन ईच्छीत आहे.

| अ.क्र. | गावाचे नाव | संपादनासाठी प्रस्तावित गावनिहाय क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|
| 1 | बेलोंडेखार | 133-55-4 |
| 2 | कौलीबेलोंडेखार | 03-65-1 |
| 3 | पौंडखार | 02-46-8 |
| 4 | जासई | 07-87-9 |
| 5 | धुतूम | 15-41-7 |
| 6 | चिर्ले | 26-78-2 |
| 7 | गाव-गावठाण | 28-63-0 |
| 8 | गाव-जांभूळपाडा | 59-52-4 |
| एकुण क्षेत्र (हे.आर) | | 277-90-5 |

सदर लॉजिस्टीक पार्क प्रकल्प विकसीत करण्यासाठी सिडको महामंडळास आवश्यक जमीनींचा तपशिल सिडको महामंडळाची वेबसाईट www.cidco.mahrashtra.gov.in तसेच अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), 1 ला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापुर यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ अन्वये शासन निर्णय क्रमांक सिआयडी/३३१७/१२९५/प्र.क्र.१८४/नावि-१० दिनांक २८.०२.२०१८ नुसार संपादनाच्या मोबदल्यापोटी २२.५% योजनेनुसार भूधारकांना विकासीत भूखंड स्वरुपातील मोबदला संगणकिय सोडतीव्दारे देण्यात येईल. उपरोक्त नमुद गावातील भूधारकांना विहीत नमुन्यातील नोटराईज्ड संमतीपत्रे सादर करावेत. संमतीपत्राचा नमुना सिडको महामंडळाची वेबसाईट www.cidco.mahrashtra.gov.in तसेच अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), 1 ला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापुर येथे उपलब्ध आहे. भूधारकांनी आपली जमीन 22.5% योजनेअंतर्गत संपादनास विहीत नमुन्यातील संमतीपत्रे अप्पर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), 1 ला मजला, सिडको भवन, सि.बी.डी. बेलापुर यांच्या कार्यालयाकडे तात्काळ सादर करावीत. विहीत नमुन्यातील संमतीपत्र प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ अन्वये भूसंपादनाची कार्यवाही करण्यात येईल व पात्र भूधारकांना २२.५% योजनेनुसार संगणकिय सोडतीव्दारे भूखंड वाटप करण्यात येतील.

सतिशकुमार खडके
अप्पर जिल्हाधिकारी तथा
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी
(भूसंपादन)